# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ११/०१/२०२४ चे ००.०१ ते १६.०० वा

## खुणाचा प्रर्यत्न

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. २८/२४ कलम ३०७, ३४ भादवी | रेणुका लॉन चे बाजुला भिवापुरकर ले -आउट अमरावती | घटना ता. वेळी - १०/०१/२०२४ चे ०९/०० वा. दरम्यान<br>दाखल ता.वेळी - ११/०१/२०२४चे ०५/१६ वा. | युवराज बळीराम वानखडे वय ५५ वर्ष काम - शेतमजुर रा. उरळ ता. बाळापुर जिल्हा अकोला | अज्ञात ०३ ते ०४ मुले | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी २० ते २५ वर्षाची अंदाजे ३ ते ४ मुले फिर्यादी यांच्या मुलाला किरकोळ कारणावरुन वाद झाला तेव्हा फिर्यादीच्या मुलाने त्याची दुचाकी गाडी रस्त्याच्या कडेला लावुन त्यांना बोलण्यासाठी गाडीच्या खाली उतरला तेव्हा त्या २० ते २५ वर्षाची अंदाजे ३ ते ४ मुलांनी सुरवातीला त्याला जुन्या भांडण्याच्या कारणा वरुन शिवीगाळ करुन थापडाभुक्यांनी मारहाण केली तेव्हा फिर्यादीच्या मुलाने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यातील एका मुलाने अचानक तेथे रस्त्याच्या कडेला पडलेली सिमेंट वीट उचलुन फिर्यादीच्या मुलाच्या डोक्यावर मारली त्यामुळे तो जखमी होवुन खाली जमिनीवर पडला तेवढयात त्या आरोपी सोबत असलेल्या इतर मुलांनी सुध्दा तेथे पडलेल्या सिमेंट विटा उचलुन फिर्यादीच्या मुलाच्या चेह-यावर, डोक्यावर, उजव्या कानावर मारुन त्याला गंभीर जखमी करुन जीवानिशी मारण्याचा प्रयत्न केला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## सरकारी कामात अडथडा

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. २७/२४ कलम३५३, ४२७, ३४ भादवी | बापु कॉलनी दस्तुर नगर डी.पी. रोड अमरावती | घटना ता. वेळी - १०/०१/२०२४ चे १७/०० वा. दरम्यान<br>दाखल ता.वेळी - ११/०१/२०२४ चे ००/०५ वा. | संदिप दिगांबर सोनोने वय ४४ वर्ष रा. महानगर पालीका अतिक्रमण विभाग अमरावती शहर | जमावातील अज्ञात ३ ते ४ महिला व पुरुष | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे शासकीय कर्मचारी असुन नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशाने अतिक्रमण विभागातील स्टॉफ सह बापु कॉलनी अमरावती या ठिकाणी अतिक्रमण काढण्याकरिता गेले असता अतिक्रमण कारवाई सुरु असतांना त्याठिकाणी जमलेल्या जमावातील अज्ञात नमुद ३ ते ४ महिला व पुरुष आरोपीतांनी संगणमत करुन सरकारी जेसीबी वाहन क्रं. एमएच २७-एसी-९९५७ वर दगडफेक करुन वाहनाच्या काचा फोडुन अंदाजे ८०००/- रु. ते १००००/- रु. चे नुकसान केले व सरकारी कामात अडथळा निर्माण केला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. नांदगावपेठ अप क्र.०९/२०२४ कलम ३८० भादवी | साई सागर अपार्टमेंट देशमुख लॉन अमरावती | ०८/०१/२०२४ चे २३.०० वा ०९/०१/२०२४ चे ०६.३० वा दाखल दि ०९/०१/२०२४ चे ००.०६ वा | सोहंग विजय वनखडे वय २० रा. साई सागर अपार्टमेंट देशमुख लॉन अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, फि.यांच्या रहाते घरी दि ०८/०१/२०२४ रोजी माझे यज्ञेश पाठक व अर्थव कव्हर हे रात्रभर रहाण्यासाठी आले होते तसेच फि. चे अमरावती येथील मित्र अर्पीता देशमुख, आयुश तिवारी, तन्मय कुरळकर, आयुष वानखडे असे आम्ही रात्री ११.०० वा जेव न करुन झोपी गेलो रात्री ०२.३० वा दरम्यान यज्ञेश अर्थव व अर्पीत हे नास्ता करायला बाहेर गेले फि. हे झोपले होते सकाळी ०६.३० वा झोपेतुन उठलो तेव्हा फि. ला फि. चा आय फोन १५+ निळया रंगाचा कि.५००००/- नगदी ५०००/- असा एकुन ५५०००/- चा माल दिसुन आला नाही वरुन अप सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो स्टे गाडगे नगर अम अप क्र ५९/२०२४ चे ३७९ भादवी | विदयुत नगर चौक अमरावती | ०२.०१.२०२४ चे २०.०० वा दातावेळ ११.०१.२०२४ चे १५.३७ वा | राजेश नारायण वरखडे वय ४५ वर्ष रा विदयुत नगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फीर्यादी यांचे वडील नारायणराव वरखडे हे वयोवृध्द असून ते २ जानेवारी २०२४ ला सायंकाळी २०.०० वा दरम्यान विदयुत नगर येथे जात असतांना पंचरच्या दुकानाजवळ थांबले तिथे एक इसमा आला ज्याने अंगात टी शर्ट व लोअर पॅन्ट घातलेला होता, केस बारीक, दाढी वाढलेली मध्यम बांधाचा त्यांचे जवळ आला त्याने जवळीकता साधून बोलण्याचा प्रयत्न करीता होता त्यामुळे त्यांनी मोबाईल फोन त्यांनी खिशात ठेवला होता. तेव्हा त्या इसमाने त्यांच्या खिशातील विवो कंपनीचा मोबाईल किं.अं. १०,०००/- रु चा चोरुन नेला. नंतर तो अनोळखी इसम दिसून आला नाही. माझे वडीलांचे खिशातील मोबाईल फोन त्याच इसमाने चोरुन नेला अशा फीचे जबानी रीपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.१३/२०२४ कलम २७९, ३३७ भा.दं.वि.सह कलम १३४मो.वा.का. | पोस्टै चे समोर डॉ. बाबासाहेब पुतळा जवळ स्पीड ब्रेकरवर नवी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.१०.०१.२०२४ चे २३.३० वा. माहिती ता.वेळ - दि.१०.०१.२०२४ चे २३.५० वा. दाखल ता.वेळ - दि११.०१.२०२४ चे ००.३९ वा. | पवन नंदलाल राठोड वय-३६ वर्ष रा. पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा ᵮ | पांढ-या रंगाची चारचाकी अज्ञात कारचा चालक क्रमांक माहित नाही | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि. पवन नंदलाल राठोड वय-३६ वर्ष रा. पाचबंगला जुनी वस्ती बडनेरा मो क्र. ८४२१११२०२० हे दि.१०.०१.२०२४ चे रात्री ११.३० वा दरम्यान त्याचे मो. सा . एम एच २७डि जे ६९४८ ने त्यांची सासु आशा अशोक बरारे वय-५० वर्ष हिला सोबत घेवुन घरी पाचबंगला येथे जात असतांना पो स्टै चे समोर डॉ. बाबासाहेब पुतळा जवळ स्पीड ब्रेकर वर फि त्यांचे मो सा ने हळुवार जात असतांना मागुन पांढ-या रंगाची चारचाकी अज्ञात कारने त्याचे वाहन भरधाव वे्गाने व हलगर्जीपणने चालवुन फि चे मो सा ला मागुन धडक दिली त्यामुळे फि व त्याची सासु असे रोडवर खाली पडले सासुचे डाव्या हाताला दोन्ही पायाला व फि ला डाव्या पायाला जख्मी झले . वरून सदर आरोपीचे कृत्य कलम २७९ ३३७ भा.दं.वि.सहकलम १३४मो.वा.का. प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |

**ईतर**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र २२/२०२४ कलम २८३ भादवि | दस्तुर नगर चौक अमरावती | दि ११.०१.२०२४ चे १२.२० वा दरम्यान<br><br>दि ११.०१.२०२४ चे १३.४५ वा | पोउपनि विजय गिते पोस्टे फ्रेजरपुरा अमरावतीशहर | संदीप अंबादास सिरसाठ वय ४० वर्ष रा.संजय गांधी नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पोस्टे हददीत गुन्हेगार तपासणी व पेट्रोलीग करित असता नमुद घटना ता वेळ व ठिकाणी गेलो असता सार्वजनिक रोडवर आपला भाजीपाल्याची गाडी लावुन लोंकाच्या जिवीताला धोका निर्माण होईल अशा स्थितीत लावुन सार्वजनिक रोडवर लोंकाच्या रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभी करून त्यावर भाजीपाला विक्री करतांना मिळुन आल्याने आम्ही सदर हातगाडया जवळ जावुन पंचनाम्यातील नमुद पंचासमोर त्यास पोस्टे स्टाफ च्या मदतीने ताब्यात घेवुन चालकास त्याचे नाव गाव विचारले आसता संदीप अंबादास सिरसाठ वय ४० वर्ष रा.संजय गांधी नगर अमरावती असे सांगितले त्यास त्याचे स्वाताचे कब्जात असलेल हातगाडा अशा प्रकारे लावण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधान कारक उत्तर दिले नाही म्हणुन रहदारास अडथळा निर्माण होवुन एखाडा गंभीर स्वरूपाचा अपघात घडुन येण्याची शक्यता असल्याने माझी त्याचे विरूध्द कलम २८३ भादवी प्रमाणे तक्रार आहे अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र २३/२०२४ कलम २८३ भादवि | दस्तुर नगर चौक अमरावती | दि ११.०१.२०२४ चे १३.०० वा दरम्यान<br><br>दि ११.०१.२०२४ चे १४.०५ वा | पोउपनि विजय गिते पोस्टे फ्रेजरपुरा अमरावतीशहर | विक्रम सुभाष कांबळे वय २२ वर्ष रा. जेवड नगर डॉ आंबेडकर पुतळाजवळ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पोस्टे हददीत गुन्हेगार तपासणी व पेट्रोलीग करित असता नमुद घटना ता वेळ व ठिकाणी गेलो असता सार्वजनिक रोडवर आपला भाजीपाल्याची गाडी लावुन लोंकाच्या जिवीताला धोका निर्माण होईल अशा स्थितीत लावुन सार्वजनिक रोडवर लोंकाच्या रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत उभी करून त्यावर भाजीपाला विक्री करतांना मिळुन आल्याने आम्ही सदर हातगाडया जवळ जावुन पंचनाम्यातील नमुद पंचासमोर त्यास पोस्टे स्टाफ च्या मदतीने ताब्यात घेवुन चालकास त्याचे नाव गाव विचारले आसता विक्रम सुभाष कांबळे वय २२ वर्ष रा. जेवड नगर डॉ आंबेडकर पुतळाजवळ अमरावती असे सांगितले त्यास त्याचे स्वाताचे कब्जात असलेल हातगाडा अशा प्रकारे लावण्याचे कारण विचारले असता त्यांनी समाधान कारक उत्तर दिले नाही म्हणुन रहदारास अडथळा निर्माण होवुन एखाडा गंभीर स्वरूपाचा अपघात घडुन येण्याची शक्यता असल्याने माझी त्याचे विरूध्द कलम २८३ भादवी प्रमाणे तक्रार आहे अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पो. स्टे. राजापेठ मर्ग क्र. ०४/२४ कलम १७४ जा.फौ. | गुप्ता चाळ अमरावती | संजय मारोतराव कु-हाडे वय ५० वर्ष रा. गुप्ता चाळ अमरावती | निलेश किसनराव अंबाडकर वय ४३ वर्ष रा. गुप्ता चाळ अमरावती | बाथरुम मध्ये पडल्यामुळे जोरजोराने श्वास घेत असल्याने | हकीकत अशा प्रकारे आहे की नक्कल जबाणी रिपोर्ट पो स्टे राजापेट अमरावती दि. ११/०१/२०२४ रोजी ०८.०० वा. ते १४.०० वा. आम्ही नापोका मेश्राम १८०१ सोबत नापोका ७३ असे तपास मदत डयुटी वर हजर असतांना ईर्विन चौकी येथुन वायरलेस व्दारे माहिती मिळाली की मयत नामे संजय मारोतराव कु-हाडे वय ५० वर्ष रा. गुप्ता चाळ अमरावती अशा माहितीवर जावुन ईर्विन चौकी येथुन मेमो क्रं. १०२७/२४ दि. ११/०१/२०२४ प्राप्त केला सदर मेमो मधील मयत नामे संजय मारोतराव कु-हाडे वय ५० वर्ष रा. गुप्ता चाळ अमरावती याचे नातेवाईक पो स्टे ला हजर आल्याने त्याचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचे घटनास्थळ पो स्टे हददीतील असुन मयत हा बाथरुम मागे पडल्याने त्याला इलाजाकरिता दवाखाण्यात नेल्याने तेथे एम ओ सा. यांनी मयत घोषित केले अशा जबाणी रिपोर्ट वरुन सदर चा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. | पोहेका जिवण बांडे ब.नं. १७५७ पो.स्टे. राजापेठ, अमरावती |

## प्रोव्हीशन रेड

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोस्टे फ्रेजरपुरा अम | अप क्र २०/२० २४ कलम ६५ ई | गवळी पुरा फ्रेजरपुरा अमरावती | दि. १०/१/ २०२४ चे २३. १५ते २३.५० वा दरम्यान | दि. ११/० १/२ ०२४ चे ००. २१वा . | पोहेकॉ दिपक महादेवराव सुंदरकर बन १४५६ गुन्हे शाखा अमरावती | भोजु चंदु रायलीवाले वय ५७ वर्ष रा. गवळी पुरा फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि प्राप्त माहीती नुसार नमुद घ ता वेळ व ठिकाणी यातील फि सोबत पोस्टे स्टॉफ सह गुप्त बातमीदाराकडफन खात्रीलायक माहीती मिळयाल्यावरून नमुद घटनास्थळी प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपीचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे १. ९ नग देशी दारू डॅगो पंच १८० एम एल च्या सिलबंद पावटया कि. अंदाजे ६३०/ — रू २. ५ नग देशी दारू बॉबी संत्रा १८०एम एल च्या सिलबंद वपावटया किं अ ३५०/— रू असा एकुन ९८०/रू चा प्राव्ही मुद्देमाल मिळुन आल्याने ते पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला नमुद आरोपीचे हे कृत्य ६५ ई मदाका होत असल्याने त्याचे विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पोस्टे फ्रेजरपुरा अम | अप क्र २१/२० २४ कलम ६५ ई | गवळी पुरा सरदार चौक फ्रेजरपुरा अमरावती | दि. १०/१/ २०२४ चे २३. १०ते २३.४५ वा | दि. ११/० १/२ ०२४ चे ००. ३६ | पोहेकॉ गजानन नामदेवराव ढेवले ब.न १६९ गुन्हे शाखा अमरावती | हुसेन गंगा बेनीवाले वय ५५वर्ष रा. सरदार चौक गवळीपुरा फ्रेजरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि प्राप्त माहीती नुसार नमुद घ ता वेळ व ठिकाणी यातील फि सोबत पोस्टे स्टॉफ सह गुप्त बातमीदाराकडफन खात्रीलायक माहीती मिळयाल्यावरून नमुद घटनास्थळी प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपीचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्याप्रमाणे हातभटटी दारू प्लास्टीक डबकीसह एकुन कि अं १५००/—रू चा प्रोव्ही मुददेमाल मिळुन आल्याने ते पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतला नमुद आरोपीचे हे कृत्य ६५ ई मदाका होत असल्याने त्याचे विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला अशा |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दरम्यान | वा | | | फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |